**वाचा :-**

१. जा.क्र./मनपा/मुलेप/कावि/२०२३/२४६, दिनांक ०६/१२/२०२३
२. शासन निर्णय क्र.एएमसी/१४९९-२/प्र.क्र.-१/९९, नवि-२४, दिनांक २४/११/१९९९
३. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ११६८/२०२४, दिनांक ११/०१/२०२४

जा.क्र./मनपा/सा.प्र.वि./२०२४/ ६३
कार्यालय छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दिनांक ११ /०१/२०२४

**कार्यालयीन आदेश :-**

उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार मुख्य लेखा परिक्षक यांनी सेवानिवृत्त झालेल्या व होणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके वेतनपडताळणीसाठी लेखा परिक्षण विभागाकडे पाठविण्यात आली असता लेखा परिक्षण विभागाने शासन निर्णय दिनांक २४/११/१९९९ मधील परि.क्र.२ (अ) व (ब) मध्ये निर्देशित केल्यानुसार अधिकारी/ कर्मचा-यांकरीता मंजूर केलेली ७ वर्षाची निवडश्रेणी रद्य करण्यात आलेली नाही. असा आक्षेप नोंदविलेला आहे. सदर वेतन निश्चिती रद्द करण्यात येऊन १२ वर्षाची वेतननिश्चिती करण्यात येऊन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक ८ जून १९९५ आणि १८ एप्रिल १९९५ नुसार कर्मचा-यांच्या संपूर्ण सेवाकाळात एकवेळ कालबध्द पदोन्नती योजनेची वेतनश्रेणी देय आहे. शासन निर्णय नगरविकास विभाग क्रमांक एएमसी-१४९९/प्र.क्र.१/९९/नवि-२४, दिनांक २४/११/१९९९ निर्देशानुसार पुनर्वेतननिश्चिती करावी व जादा अदा झालेल्या वसूलीच्या अनुषंगाने वित्त विभागाचे परिपत्रक क्र.संकिर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दिनांक २२/११/२०२१, प्र.क्र.५४, दिनांक ०७/१०/२०२२ आणि प्र.क्र.३४, दिनांक १७/०८/२०२३ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. असे कळविले आहे.

संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार खालील अटींच्या अधिन राहून ५ वा वेतन आयोग औरंगाबाद महानगरपालिकेस लागू करण्यात आला.

(अ) महानगरपालिका सेवाभरती नियमांनुसार १५ वर्ष सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना लागू असलेली निवडश्रेणी रद्द करण्यात यावी.

(ब) महानगरपालिका सेवाभरती नियमांनुसार कर्मचाऱ्यांना ७ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी लागू करण्यात येते. मात्र राज्य शासनाने १२ वर्षानंतर कालबध्द पदोन्नती अथवा पुढील वेतनश्रेणी लागू केली आहे. यास्तव औरंगाबाद महानगरपालिकेने राज्य शासनाच्या तरतूदीप्रमाणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी सेवाभरती नियमात तशी तरतूद करणे आवश्यक राहील. म्हणजेच महानगरपालिका सेवाभरती नियमांत ७ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतूद रद्द करुन १२ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतूद करणे आवश्यक राहील.

संदर्भ क्र.३ च्या मा.सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार शासन निर्णय क्रमांक एएमसी-१४९९/प्र.क्र.१/९९/नवि-२४, दिनांक २४/११/१९९९ मध्ये महानगरपालिका सेवाभरती नियमांत ७ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतूद रद्द करुन १२ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतूद करणे आवश्यक राहील असे नमूद केले आहे. सेवाभरती नियमात दुरुस्ती पूर्वलक्षी प्रभावाने लागू होत नसल्याने दिनांक ०९/०६/१९९४ पासून ते दिनांक २३/११/१९९९ पर्यंतच्या कालावधीत ७ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या गट क व गट ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना सेवाभरती नियमानुसार प्रदान करण्यात आलेले लाभ कायम ठेवण्यात यावेत व दिनांक २४/११/१९९९ नंतर ७ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना जर सदरची समयश्रेणी अथवा पुढील वेतनश्रेणी दिली असल्यास ती रद्द करण्यात यावी. त्यांना शासन नियमानुसार १२ वर्षानंतर आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्यासाठी मान्यता देण्यात येते.

**आयुक्त तथा प्रशासक**
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

प्रत -
१) सर्व विभाग प्रमुख
२) आदेश संचिका

महानगरपालिका सचिव छत्रपती संभाजीनगर

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**विषय क्र.-११६४/२०२४** **दिनांक ११/०१/२०२४**

औरंगाबाद महानगरपालिकेचा सेवाभरती नियम १६ मे १९९४ मधील नियम ५ (अ) व (ब) नुसार, सतत ७ वर्ष एकाच पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना समयश्रेणी देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मा. आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका यांचे आदेश जा.क्र./मनपा/ आस्था-१/९८/९१९, दिनांचा २०/०३/१९९८ नुसार विहीत केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून निवडश्रेणी देण्यास मंजूरी दिलेली आहे.

तथापि शासन निर्णय क्रमांक एएमसी-१४९९/प्र.क्र.१/९९/नवि-२४,दिनांक २४/११/१९९९ मधील परि. क्र. (अ) नुसार महानगरपालिका सेवाभरती नियमानुसार १५ वर्ष सेवा झालेल्या कर्मचा-यांना लागू असलेली निवडश्रेणी रद्द करण्यात यावी असे निर्देश आहे. तसेच उक्त शासन निर्णयालील २ (ब) मध्ये असे नमूद केले आहे की, महानगरपालिका सेवाभरती नियमांनुसार कर्मचा- यांना ७ वर्षांनंतर पुढील वेतनश्रेणी लागू करण्यात येते. मात्र राज्य शासनाने १२ वर्षानंतर कालबध्द पदोन्नतीअथवा पुढील वेतनश्रेणी लागू केली आहे. यास्तव औरंगाबाद महानगरपालिकेने राज्य शासनाच्या तरतुदीप्रमाणे महानगरपालिका कर्मचा-यांसाठी सेवाभरती नियमात तशी तरतूद करणे आवश्यक राहील. म्हणजेच महानगरपालिका सेवाभरती नियमांत ७ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतुद रद्द करुन १२ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतूद करणे आवश्यक राहील.

परंतु, सेवानिवृत्त झालेल्या व होणाऱ्या कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके वेतनपडताळणीसाठी लेखा परिक्षण विभागाकडे पाठविण्यात आली असता लेखा परिक्षण विभागाने शासन निर्णय दिनांक २४/११/१९९९ मधील परि.क्र.२ (अ) व (ब) मध्ये निर्देशित केल्यानुसार अधिकारी/ कर्मचा-यांकरीता मंजूर केलेली ७ वर्षाची निवडश्रेणी रद्य करण्यात आलेली नाही. असा आक्षेप नोंदविलेला आहे. सदर वेतन निश्चिती रद्द करण्यात येऊन १२ वर्षाची वेतननिश्चिती करण्यात येऊन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक ८ जून १९९५ आणि १८ एप्रिल १९९५ नुसार कर्मचा-यांच्या संपूर्ण सेवाकाळात एकवेळ कालबध्द पदोन्नती योजनेची वेतनश्रेणी देय आहे. शासन निर्णय नगरविकास विभाग क्रमांक एएमसी-१४९९/प्र.क्र.१/९९/नवि-२४,दिनांक २४/११/१९९९ निर्देशानुसार पुनर्वेतननिश्चिती करावी व जादा अदा झालेल्या वसूलीच्या अनुषंगाने वित्त विभागाचे परिपत्रक क्र.संकिर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दिनांक २२/११/२०२१, प्र.क्र.५४, दिनांक ०७/१०/२०२२ आणि प्र.क्र.३४, दिनांक १७/०८/२०२३ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. असे कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मुलेप/कावि/२०२३/२४६, दिनांक ०६/१२/२०२३ अन्वये कळविले आहे. तथापी औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये यापूर्वी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

०१. औरंगाबाद महानगरपालिकेच्या कर्मचारी सेवाभरती नियम १९९४ नियम ५ नुसार महानगरपालिका आस्थापनेवर सतत सात वर्ष एकाच पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना निवडश्रेणी तसेच सतत पंधरा वर्ष सेवा केलेल्या कर्मचाऱ्यांना समयश्रेणी देण्यास मान्यता दिली आहे.

०२. औरंगाबाद महानगरपालिकेचे सेवाभरती नियम दिनांक ०९/०६/१९९४ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेले असून त्या दिनांकापासून सेवाभरती नियम लागू झालेले आहेत.

०३. सेवाभरती नियमानुसार निवडश्रेणी लागू करण्यासाठी महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीचे परिशिष्ठ, अटी व शर्ती तयार करुन त्यास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.११७/५, दिनांक ०४/१२/१९९७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

०४. उक्त ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिकेने कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/१९९८/६१९, दिनांक २३/०३/१९९८ अन्वये मनपा आस्थापनेवर गट 'क' गट 'ड' (पूर्वीचे वर्ग-३ व ४) मधील पदधारकांना सात वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदाची वेतनश्रेणी लागू करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर आदेशामध्ये योजना लागू करण्याच्या अटी शर्ती नमूद करण्यात आलेल्या आहेत, त्यानुसार दिनांक ०९/०६/१९९४ पासून महानगरपालिका कर्मचाऱ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

०५. शासन निर्णय क्र.एएमसी/१४९९-२/प्र.क्र.-१/९९, नवि-२४, दिनांक २४/११/१९९९ अन्वये खालील अटींच्या अधिन राहून ५ वा वेतन आयोग लागू करण्यात आला.

(अ) महानगरपालिका सेवाभरती नियमांनुसार १५ वर्ष सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना लागू असलेली निवडश्रेणी रद्द करण्यात यावी.

(ब) महानगरपालिका सेवाभरती नियमांनुसार कर्मचाऱ्यांना ७ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी लागू करण्यात येते. मात्र राज्य शासनाने १२ वर्षानंतर कालबध्द पदोन्नती अथवा पुढील वेतनश्रेणी लागू केली आहे. यास्तव औरंगाबाद महानगरपालिकेने राज्य शासनाच्या तरतूदीप्रमाणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी सेवाभरती नियमात तशी तरतूद करणे आवश्यक राहील. म्हणजेच महानगरपालिका सेवाभरती नियमांत ७ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतूद रद्द करुन १२ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतूद करणे आवश्यक राहील.

०६. त्यानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना वरील मुद्दा क्र. (अ) ची वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नाही. मुद्दा क्र. (ब) च्या अनुषंगाने जा.क्र.मनपा/आस्था-१/१९९८/६१९, दिनांक २३/०३/१९९८ अन्वये महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना त्यांची सेवा ७ वर्ष पूर्ण झाल्यानंतर पदोन्नती साखळीतील वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. दिनांक ०९/०६/१९९४ पासून ते दिनांक २३/११/१९९९ पर्यंतच्या कालावधीत ७ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या गट क व गट ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना सेवाभरती नियमानुसार लाभ प्रदान करण्यात आलेला आहे.दिनांक २४/११/१९९९ नंतर ज्या कर्मचाऱ्यांना ७ वर्ष पूर्ण झाले आहेत त्यांना ७ ऐवजी १२ वर्षानंतर कालबध्द पदोन्नती अथवा पुढील वेतनश्रेणी लागू केली आहे.

करीता शासन निर्णय क्रमांक एएमसी-१४९९/प्र.क्र.१/९९/नवि-२४, दिनांक २४/११/१९९९ मध्ये महानगरपालिका सेवाभरती नियमांत ७ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतूद रद्द करुन १२ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतूद करणे आवश्यक राहील असे नमूद केले आहे. सेवाभरती नियमात दुरुस्ती पूर्वलक्षी प्रभावाने लागू होत नसल्याने दिनांक ०९/०६/१९९४ पासून ते दिनांक २३/११/१९९९ पर्यंतच्या कालावधीत ७ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या गट क व गट ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना सेवाभरती नियमानुसार प्रदान करण्यात आलेले लाभ कायम ठेवण्यात यावेत व दिनांक २४/११/१९९९ नंतर ७ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना जर सदरची समयश्रेणी अथवा पुढील वेतनश्रेणी दिली असल्यास ती रद्द करण्यात यावी. त्यांना शासन नियमानुसार १२ वर्षानंतर आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्यात यावेत, असा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :-** 1168/2024

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णय क्रमांक एएमसी-१४९९/प्र.क्र.१/९९/नवि-२४, दिनांक २४/११/१९९९ मध्ये महानगरपालिका सेवाभरती नियमांत ७ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतूद रद्द करुन १२ वर्षानंतर पुढील वेतनश्रेणी देणेची तरतूद करणे आवश्यक राहील असे नमूद केले आहे. सेवाभरती नियमात दुरुस्ती पूर्वलक्षी प्रभावाने लागू होत नसल्याने दिनांक ०९/०६/१९९४ पासून ते दिनांक २३/११/१९९९ पर्यंतच्या कालावधीत ७ वर्ष सेवा पूर्ण झालेल्या गट क व गट ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना सेवाभरती नियमानुसार प्रदान करण्यात आलेले लाभ कायम ठेवण्यात यावेत व दिनांक २४/११/१९९९ नंतर ७ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना जर सदरची समयश्रेणी अथवा पुढील वेतनश्रेणी दिली असल्यास ती रद्द करण्यात यावी. त्यांना शासन नियमानुसार १२ वर्षानंतर आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्यासाठी मान्यता देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**महानगरपालिका सचिव**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**

**प्रशासक**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**